REVIEW OF RESEARCH

# संत श्री.देवेंद्रनाथ सुळे महाराज यांचे अहमदनगर जिल्हयातील कार्य

प्रा.हरिदास शंकर जाधव

इतिहास विभागप्रमुख चां. ता. बोरा महाविद्यालय, शिरुर जि.पुणे

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



अहमदनगर जिल्हात होऊन गेलेल्या संत परंपरेतील एक महत्वाचे संत म्हणून श्री देवेंद्रनाथ सुळे महाराज यांचा उल्लेख करावा लागेल. आपल्या अप्रतिम गुरुभक्तीने व नाथ सेवेने ते परमपूज्य देवेंद्रनाथ बनले. त्यांचे अध्यात्मिक जीवन अतिशय उत्तुंग होते. आपले अध्यात्मिक सामर्थ्य व सामाजिक कार्यामुळे अहमदनगर जिल्हयाच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनावर सुळे महाराजांचा प्रभाव दिसून येतो.

## बालपण व शिक्षण

देवेंद्रनाथ महाराजांचे वडील वनखात्यामध्ये अधिकारी होते. त्यामुळे त्यांच्या अनेक ठिकाणी बदल्या होत असत. साहजिकच देवेंद्रनाथाचे शिक्षण जळगाव जिल्हयातील जामनेर, रायगड जिल्यातील पाली, महाड, व मुंबई इ. विविध ठिकाणी झाले.[१] व्यवसायाने ते वास्तुविशारद होते, पण लहानपणापासून त्यांचा अध्यात्मिक विषयाकडे ओढा होता. मे १९६९ मध्ये त्यांचा विवाह होऊन ते नौकरी निमित्ताने मुंबईला गेले. एप्रिल १९७० ते १९७२ या कालावधीत त्यांनी मुंबई येथे नौकरी केली व व्यवसायाच्या निमित्ताने जून १९७२ मध्ये ते अहमदनगर येथे आले.[२] येथूनच त्यांच्या आयुष्याच्या एका नव्या पर्वाला प्रारंभ झाला. अध्यात्माची लहानपणापासूनच आवड असल्याने त्यांचे मन अध्यात्माकडे ओढू लागले. त्यांना श्री. राघवेंद्र स्वामी यांनी दृष्टांत देऊन गुरुमंत्र दिला तेथूनच देवेंद्राच्या अध्यात्मिक जीवनाला प्रारंभ झाला.

नाथ संप्रदाय हा गुरुनिष्ठ आहे. त्यात गुरु—शिष्याचे नातेही पिता—पुत्राप्रमाणे असते. गुरुविषयीचे अत्यंतिक प्रेम, गुरुच्या ठिकाणी असलेली अढळ श्रध्दा आणि गुरुबद्दलचा कमालीचा भक्तीभाव या पंथात आढळतो. अशा या नाथ संप्रदायाचा मोठा वारसा चालविण्याचे काम देवेंद्रांनी केले. ते असामान्य गुरुनिष्ठ होते. गुरुच्या चरणी लीन होऊन आपले अध्यात्मिक जीवन जगत होते.[३]

## देवेंद्रांची गुरुभक्ती:

इ.स. १९७५ च्या आपल्या पहिल्याच अलख निरंजन या मासिकातून देवेंद्रनाथांनी आपले सद्गुरु श्री. राघवेंद्र स्वामी यांना अतिशय भक्तीभावाने '' वंदन तुजला गुरुराया, राघवेंद्र गुरुराजा'' असा अत्यंत लीनतेचा भाव देऊन '' मी तुमचा दास गुरुमाऊली तुमची सेवा माझ्या हातून घडू द्या'' अशी कळकळीची विनंती केली आहे.

## अहमदनगर नाथांची भूमी:

अहमदनगर जिल्हा म्हणजे नाथ संप्रदायाचे महत्वाचे ठिकाण. येथील गर्भगिरीच्या परीसरात अनेक नाथ सिध्दांची पवित्र स्थाने आहेत. मच्छींद्रनाथ, कानिफनाथ यांच्या संजीवन समाध्या आहेत. अशा नाथ संप्रदायाच्या पवित्र क्षेत्रात व्यवसाया निमित्त येऊन देंवेद्र महाराज रमले. म्हणून त्यांनी अहमदनगर जिल्हा हे आपले कार्यक्षेत्र ठरवून '' श्री.नवनाथ देवस्थान सेवा मंडळ ट्रस्ट'' त्यांनी स्थापन केला. यामागील महत्वाचा उद्देश म्हणजे या परीसरात असलेल्या वेगवेगळया नाथांच्या समाध्यांचा जीर्णोद्धार करणे. नाथ पंथीय तत्वज्ञानाचा अभ्यास व संशोधन करणे, नाथांच्या स्थानांची ऐतिहासिक माहिती मिळविणे व समाजापर्यंत नाथपंथीयांचे कार्य पोहचविणे हा होता. यासाठी त्यांनी अलक निरंजन यासारखी मासिके सुरु केली.

## साहित्यिक कार्य:

अध्यात्कि कार्याबरोबरच देवेंद्रनाथ महाराजांनी मोठे साहित्यिक कार्यही केले आहे. नवनाथांच्या अखंड सेवेसाठी

त्यांनी साहित्य साधना सुरु केली. आपल्या अलख निरजंन या दिवाळी अंकाच्या माध्यमातून नवनाथांच्या जीवनातील निरनिराळे महत्वपूर्ण प्रसंग टिपले व समाजापर्यंतही ते पोहचविले. नवनाथांच्या भक्तीचे बीज त्यांच्या अंतरंगात भिनले होते. म्हणूनच नाथ साहित्यातून भक्तीची चिरंतन ज्योत त्यांनी तेवत ठेवली. नाथ पंथातील पुण्यविभूतींची चरित्रे, नाथ साधना, नाथांची काव्ये, नाथपंथी लघुकथा, महाराष्ट्रात असलेल्या नाथपंथी स्थानांची पूर्वपिठिका व सचित्र दर्शन,नाथपंथीय चिकित्सा शास्त्र आणि योगसाधना यांच्या शबरी विद्येचे वर्णन, शिवदिन नाथांपासून नेपाळच्या नरहरी नाथांपर्यंतच्या योगीजनांची अध्यात्मिक ओळख त्यांनी आपल्या साहित्यातून करुन दिली.[४] अलख निरंजनच्या सहा दिवाळी अंकातून देवेंद्रनाथांनी चाळीस लघुकथा प्रसिध्द केल्या. एक संशोधक म्हणून संपूर्ण भारतभर भ्रमंती करुन नाथपंथांची स्थाने व साहित्याचा अभ्यास केला. देवेंद्रनाथांनी हाताळलेला सर्वात महत्वाचा विषय म्हणजे नाथपंथाचे तत्वज्ञान होय. तत्वज्ञानाचा वेध घेताना देवेंद्रनाथांनी निसर्गत:च चपळ व तेजस्वी असलेली बुध्दिमत्ता न वापरता अफाट वाचन व ज्ञानार्जन करुन तत्वज्ञानरुपी निर्झराचे रसपान वाचकांना त्यांच्या चैतन्य ही इच्छाशक्ती, गुरुध्यान हीच गुरुसेवा, अनुग्रह हाच पूनर्जन्म, तप हाच सोमयाग, मनमूळ पवनबेला आदी लेखातून त्यांनी साहित्यिक तत्वज्ञानातून परमात्याविषयीची तळमळ व्यक्त केली आहे .[५]

## नाथभूमीतील कार्य :

अहमदनगर जिल्हयात व्यवसायानिमित्त आल्यानंतर ते अध्यात्माकडे आकृष्ट झाले व अहमदनगर परीसरातील नाथांच्या पवित्र स्थानांमध्ये ते रमले. कानिफनाथांच्या मढीतच ते राहू लागले व हाच परीसर त्यांनी आपले कार्यक्षेत्र म्हणून निवडला. प्रथमत: त्यांनी कानिफनाथ समाधी मंदीराचा जीर्णोद्धार केला सर्व परीसर स्वच्छ करुन पिण्याचे पाणी, वीज, इ. सुविधांची व्यवस्था केली. यानंतर गर्भगिरी परीसरात असणा—या अनेक समाध्या व तीर्थक्षेत्रे त्यांनी दुरुस्त केली. नेवासा येथे चैतन्य कानिफनाथ पेपर मील सुरु करुन त्यातून आलेला पैसा अध्यात्मिक व सामाजिक कार्यासाठी वापरण्याचा त्यांचा विचार होता पण ते त्यांच्या हयातीत शक्य झाले नाही.[६]

देवेंद्र महाराज हे जरी नाथपंथीय असले तरी समाजातील सर्व थरातील, सर्व धर्मातील लोकांनी कोणताही भेदभाव न मानता एकत्र यावे व गुण्यागोविंदाने नांदावे अशी त्यांची शिकवण होती. [७] त्यामुळे आजही कान्होबाच्या मढीत कोणत्याही जातीधर्माच्या व्यक्तींना वेगळी वागणूक दिली जात नाही. आपल्या शिष्यानांही त्यांनी सर्वधर्म समभावाचाच संदेश दिला. एके ठिकाणी ते म्हणतात,

मंत्र—तंत्र हे साधन नाही
जपा—तपाचा दंभही नाही
भवमायेची इच्छा नाही
दास भाव हा सदैव ठेवा [८]

नुसत्या कोरडया उपदेशाने नव्हे तर स्वत:च्या वृत्तीने व आचरणाने आदर्शाचा ठेवा त्यांनी आपल्या शिष्यांपुढे व समाजापुढे ठेवला. संसारिक जीवन जगत असतानाही मायेच्या जाळयात न गुरफटता अध्यात्मिक कार्य करता येते हा महान आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला.

## संदर्भ व तळटीपा:

१. चंद्रकांत सुळे, अलख निरंजन दिपावली अंक ,१९८३ संपा. जितेंद्रनाथ, पृ. ४
२. सौ. वैशाली मारुती सुळे, अलख निरजंन दिपावली अंक, १९८४, संपा. जितेंद्रनाथ, पृ.७२
३. सौ. हेमलता नेवासकर, अलख निरजंन दिपावली अंक, १९८५, संपा. जितेंद्रनाथ, पृ.३०
४. देवेंद्रनाथांची गुरुस्तवने, हेमलता नेवासकर, पृ. ३०
५. तत्रैव, पृ. ५६
६. चंद्रकांत सुळे, अलख निरंजन दिपावली अंक ,१९८३ संपा. जितेंद्रनाथ, पृ. ५९
७. सौ. हेमलता नेवासकर, अलख निरजंन दिपावली अंक, १९८५, संपा. जितेंद्रनाथ, पृ.५
८. उल्हास देशमुख, अलख निरंजन दिपावली अंक, १९८३, संपा. जितेंद्रनाथ, पृ.२६